Remote E-voting, E-voting at AGM and manner of procuring login id and password

Members can cast their vote(s) on the business as set out in the Notice of the AGM through remote e-voting facility. Shareholders whose Email IDs are already registered with the Company/ Depository, are requested to follow the Instructions for e-voting which will be provided in the Notice of the AGM. Shareholders whose Email IDs are not registered with the Company/ Depository Participants, are requested to follow below process for procuring User ID and Password for e-voting:

A) In case shares are held in physical mode, please provide signed scan copy of request letter mentioning Folio No., Name of shareholder, along with self- attested scan copy of PAN card, Aadhar Card/any other address proof by email to Link Intime at delhi@linkintime.co.in.
B) In case shares are held in demat mode, please provide signed scan copy of request letter mentioning DPID-CLID, Name, along with self-attested scan copy of PAN card, Aadhar Card/any other address proof by email to Link Intime at delhi@linkintime.co.in.
C) Alternatively member may send an e-mail request to evoting@nsdl.co.in for obtaining User ID and Password by proving the details mentioned in Point (A) or (B) as the case may be.

Book Closure

The Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed from Wednesday, 14th August, 2024 to Wednesday, 21st August, 2024 (both days inclusive) for the 33rd AGM.

By order of the Board of Directors
For Margo Finance Limited

Sd/-
Krishna Makwana
Company Secretary

Date : 26th July, 2024
Place : Mumbai

# ‘दत्त’वर गणपतराव पाटील यांचेच वर्चस्व

## १८ पैकी १८ जागांवर विजय : ३ जागा बिनविरोध; विरोधी आघाडीचा धुव्वा

**जयसिंगपूर : पुढारी वृत्तसेवा**

शिरोळ येथील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत चेअरमन गणपतराव पाटील यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी श्री दत्त शेतकरी विकास पॅनेलने एकतर्फी वर्चस्व मिळविले. पॅनेलचे सर्व १८ उमेदवार ११ हजार ५०० मतांच्या फरकांनी विजयी झाले. विरोधी आघाडीचा धुव्वा उडविला. बचाव पॅनेलच्या उमेदवारांनी २ हजार मतांचाही आकडा केला नाही. विजयानंतर सत्ताधारी आघाडीच्या समर्थकांनी गुलालाची उधळण करीत फटाक्यांची आतषबाजी केली.

२१ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. यात ३ जागा बिनविरोध झाल्या होत्या, तर १८ जागांसाठी बुधवारी कारखाना कार्यस्थळावर ६१.३७ टक्के मतदान झाले होते. गुरुवारी मतमोजणी झाली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अमोल येडगे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी डॉ. संपत खिलारी, जिल्हा उपनिबंधक सुनील धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ८ वाजता श्री दत्त कारखाना कार्यस्थळावरील साखर गोडावून क्रमांक ११ या ठिकाणी मतमोजणीस सुरुवात झाली. ६७ टेबलांवर मतमोजणी प्रक्रिया पार पडली. श्री दत्त पॅनेलचे विजयी उमेदवार व कंसात मिळालेली मते : **‘अ’ वर्ग उत्पादक सभासद गट :** गणपतराव आप्पासाहेब पाटील (१३१०७), अमर बाबाजी यादव (१३२२३), अनिलकुमार दिनकरराव यादव (१३२८६), अरुणकुमार शंकर देसाई (१३१८१), बाबासो शंकर पाटील (१३१६५), बसगोंडा मलगोंडा पाटील (१२९५७), दरगू गोपाळ माने-गावडे (१२९४०), ज्योतीकुमार सिद्धगोंडा पाटील (१२६९७), निजामसो गौस पाटील (१२६५६), प्रमोद वसंत पाटील (१२९८३), रघुनाथ देवगोंडा पाटील (१२८९०), शरदचंद्र विश्वनाथ पाठक (१२७८८), शेखर कलगोंडा पाटील (१२७४०), सिद्धगोंडा बाबगोंडा पाटील (१२५३५), विनया रमेश घोरपडे (१२६५६), विश्वनाथ धोंडी माने (१२२२३).

**‘अ’ वर्ग उत्पादक महिला सभासद संघ :** अस्मिता सतीश पाटील (१४७८३), संगीता संजय पाटील-कोथळीकर (१४२०७). **‘अ’ वर्ग उत्पादक सभासद अनुसूचित जाती-जमाती संघ :** सुरेश सदाशिव कांबळे (बिनविरोध). **बिगर उत्पादक सभासद व संस्था संघ :** इंद्रजित पासगोंडा पाटील, रणजित अशोक कदम (बिनविरोध).

**विरोधी पॅनेलचे पराभूत उमेदवार व कंसात मिळालेली मते :** ‘अ’ वर्ग उत्पादक सभासद गट- संजय भाऊसो चौगुले (१८४१), दरगू दत्तू चुडमुंगे (१७०१), ज्ञानू गणपती जगदाळे (१५८८), भीमराव सखाराम माने (१४३२), दीपक ऊर्फ पुंडलिक कृष्णा पाटील-नाईक (१४८३), सोमनाथ शिवलिंग तेली (१२७३). ‘अ’ वर्ग उत्पादक महिला गट- अलका जयवंत माने (१४१९).



गणपतराव पाटील, अरुणकुमार देसाई, अनिलकुमार यादव, अमर यादव, बाबासो पाटील, बसगोंडा पाटील, दरगू गावडे, ज्योतीकुमार पाटील, निजामसो पाटील, प्रमोद पाटील, रघुनाथ पाटील, शरदचंद्र पाठक, शेखर पाटील, सिदगोंडा पाटील, विश्वनाथ माने, विनया घोरपडे, अस्मिता पाटील, संगीता पाटील, इंद्रजित पाटील, रणजित कदम, सुरेश कांबळे

### ३ हजार १३९ मतपत्रिका ठरल्या अवैध

‘अ’ वर्ग उत्पादक महिला गटाच्या मतपत्रिकेवर २ व ‘अ’ वर्ग उत्पादक सभासद गटाच्या मतपत्रिकेवर १६ मते आवश्यक होती. अनेक मतपत्रिकांवर १८ शिक्के पडल्याने २ हजार ३१३ मतपत्रिका अवैध आणि ‘अ’ वर्ग उत्पादक महिला गटातील ८३८ मतपत्रिका अशा एकूण ३ हजार १३९ मतपत्रिका बाद ठरविण्यात आल्या.

### पाच नव्या चेहऱ्यांना संधी

सध्या झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत चेअरमन गणपतराव पाटील यांनी संचालक मंडळात दरगू गावडे, ज्योतीकुमार पाटील, सिद्धगोंडा पाटील, अस्मिता पाटील व सुरेश कांबळे या ५ नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.

> “दत्त कारखान्याने शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी विविध योजना राबवल्या आहेत. कार्यक्षेत्रातील जमीन क्षारपडमुक्त करून त्या ठिकाणी नंदनवन केले आहे. त्यामुळे सभासदांनी आमच्यावर विश्वास ठेवून विरोधकांच्या केलेल्या खोट्या आरोपांना मतपेटीतून उत्तर दिले. सभासदांनी दाखवलेल्या विश्वासाला पात्र राहून कारखान्याचा कारभार पारदर्शी करून सभासद व कामगारांचे हित यापुढेही जोपासणार आहे.
> - **गणपतराव पाटील,** चेअरमन, दत्त कारखाना

## संक्षिप्त

### लोखंडी पाईपने मारहाण; चौघांना अटक

**कोल्हापूर :** लोखंडी पाईपने डोक्यात प्रहार करून जखमी केल्याप्रकरणी राजारामपुरी पोलिसांनी चौघांना अटक केली. सलीम वहाब शेख (वय ४२, रा. सरनाईक वसाहत, कोल्हापूर), मुंज्या ऊर्फ मुज्जफर इनायतुल्ला नायकवडी (२८, मुजावर गल्ली, कागल), आयान रहिमान अत्तार (२०, रोहिदास कॉलनी, सुभाषनगर), ऋषीकेश अशोक पाटील (२३, सरनाईक वसाहत, कोल्हापूर) अशी संशयितांची नावे आहेत. विशाल पांडुरंग जाधव (वय ३५, रंकाळा स्टँड, कोल्हापूर) यांनी फिर्याद दाखल केली आहे. मोटारीवर स्क्रॅच मारल्याच्या वादातून हा प्रकार घडल्याचे राजारामपुरी पोलिस ठाण्यातून सांगण्यात आले. वाय. पी. पोवारनगर परिसरात बेकरीशेजारी मंगळवारी सायंकाळी हा प्रकार घडला.

### सेंट्रिंग कामगाराचा मृत्यू

**कोल्हापूर :** दंश झाल्याने लक्षतीर्थ वसाहत येथील सेंट्रिंग कामगार राहुल शांताराम वासुदेव (वय ४८) यांचा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. सेंट्रिंग कामासाठी गेल्यानंतर वासुदेव यांना काही तरी चावले होते. मंगळवारी सकाळी हा प्रकार घडला. बुधवारी त्यांना त्रास होऊ लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मध्यरात्री त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे. सीपीआर पोलिस चौकीमध्ये घटनेची नोंद झाली आहे.

### कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की; २५ जणांवर गुन्हा

**कोल्हापूर:** ताराबाई पार्क येथील एका मॉलमधील कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की, शिवीगाळ केल्याप्रकरणी अनोळखी महिला, मनसे पदाधिकारी राजू दिंडोर्ले, प्रसाद पाटील, अजिंक्य शिंदे यांच्यासह २५ जणांविरुद्ध शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजिंक्य शिवराम थोरात (वय ३९, रा. खामगाव, ता. हवेली, सध्या रंकाळा, अंबाई टँक, कोल्हापूर) यांनी फिर्याद दाखल केली आहे. दिंडोर्ले यांच्यासह जमावाने मॉलमध्ये प्रवेश करून आरडाओरड करून कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की, शिवीगाळ केल्याचे म्हटले आहे.

### शाहूपुरीतील तरुणाची आत्महत्या

**कोल्हापूर :** शाहूपुरी येथील केदार चेतन पोवार (वय २३, रा. सहावी गल्ली, शाहूपुरी) याने पत्राच्या शेडमध्ये छताच्या लाकडी वाशाला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. कुटुंबीय, नातेवाईकांच्या निदर्शनास हा प्रकार येताच गळफास सोडवून त्यास बेशुद्ध अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. गुरुवारी सकाळी ही घटना घडली. सीपीआर पोलिस चौकीमध्ये घटनेची नोंद झाली आहे.

### विजेच्या धक्क्याने तीन रेडकांचा मृत्यू

**कसबा सांगाव :** कसबा सांगाव (ता. कागल) येथील टेंबी परिसरात असलेल्या जनावरांच्या गोठ्यात विद्युत प्रवाह उतरल्याने विजेचा धक्का बसून तीन रेडकांचा मृत्यू झाला. रात्री आठच्या सुमारास जोरदार वाऱ्यामुळे विद्युत वाहिनीवर झाड कोसळून शॉर्टसर्किटमुळे ही घटना घडली. यामध्ये विक्रम माने यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तलाठी दिगंबर पाटील यांनी पंचनामा केला.

### हिप्परगी धरणातून पाण्याचा मोठा विसर्ग करण्यासाठी पूरपट्ट्यातील नागरिकांचा रास्ता रोको

**इचलकरंजी :** कर्नाटक सरकारने जमखंडी तालुक्यातील कृष्णा नदीवरील हिप्परगी धरणातून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात करावा, या मागणीसाठी इचलकरंजी पूरपट्ट्यातील नागरिकांनी गुरुवारी महात्मा गांधी पुतळ्यासमोर रास्ता रोको आंदोलन केले. कर्नाटक राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा देत निषेध करण्यात आला. मुख्य चौकात रास्ता रोको केल्यामुळे काही काळ वाहतुकीची कोंडी झाली. पोलिस प्रशासनास निवेदन दिल्यानंतर रास्ता रोको थांबवण्यात आला. आंदोलनात अमृत भोसले, बाळासाहेब कलागते, महावीर कोल्हापुरे, संजय कुलकर्णी, सरदार मुजावर आदी सहभागी झाले होते.

## ‘गोकुळ’चे ४८ गावांतील दूध संकलन ठप्प

### सात दिवसांत २७ हजार लिटर दूध संकलन घटले

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पावसामुळे मार्ग बंद झाल्याने ‘गोकुळ’च्या दूध संकलनावर परिणाम होऊ लागला. गेल्या सात दिवसांत २७ हजार लिटर दूध संकलन घटले आहे. अकरा मार्गांवरील ४८ गावांतील दूध संकलनावर परिणाम झाला आहे. गुरुवारी एका दिवसात ६ हजार ५२५ दूध संकलन घटले आहे.

पन्हाळा तालुक्यातील पडसळी, कोलीक, चाफेवाडी, गोठणे, चव्हाणवाडी, पोंबरे, काळजवडे, किसरूळ, काऊरवाडी, खापणेवाडी, तांदूळवाडी, गोठणवाडी, शाहूवाडी तालुक्यातील नांदारी, गगनबावडा तालुक्यातील बाळेवाडी, वेतवडे, मणदूर, गगनबावडा, पाटीलवाडी, धनगरवाडी, खोपडेवाडी, मांडुकली, कोदे, ठाकूरवाडी, तळपे, रावणवाडी, असंडोली, पोंबरे, देसर्डे, शिंदेवाडी, तिसंगी, मार्गेवाडी तसेच शाहूवाडी तालुक्यातील विठ्ठलवाडी, खेडे, शित्तूर तर्फ वारुण, राऊतवाडी, शिराळे, औतूर, धनगरवाडा, विरळे, मालगाव, पळसवडे, खोतवाडी आणि बुरंबाळ या गावांतील दूध संकलन ठप्प राहिले.

## वडणगेचा पिण्याचा पाणी पुरवठा बंद

**वडणगे :** वडणगे गावाला पाणीपुरवठा करणारे प्रयाग संगमावरील जॅकवेल पाण्याखाली गेल्याने याठिकाणचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. त्यामुळे वडणगे गावाला होणारा पिण्याचा पाणीपुरवठा बंद झाला आहे. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन ग्रामपंचायतीकडून करण्यात आले आहे.

प्रयाग चिखली येथील संगमावर असलेल्या उपसा केंद्रातून वडणगे गावाला पाणीपुरवठा केला जातो. मात्र, पुराच्या पाण्यात हे जॅकवेल बुडाल्याने या ठिकाणचा वीजपुरवठा बुधवारी बंद करण्यात आला आहे.

## ‘राधानगरी’तून ८ हजार ६४० क्युसेक विसर्ग

**राधानगरी : पुढारी वृत्तसेवा**

राधानगरी धरण पूर्ण क्षमतेने भरले असून गुरुवारी एकूण पाच स्वयंचलित दरवाजे खुले झाले. या दरवाजामधून ७ हजार १४० व वीजगृहातून १५०० क्युसेक असा एकूण ८ हजार ६४० क्युसेक विसर्ग भोगावती नदीपात्रात होत असून नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

बुधवारी रात्री धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्यामुळे पाणी पातळीत वाढ होऊन गुरुवारी सकाळी धरण पूर्ण संचय क्षमतेने भरले. सकाळी १०.०५ मी. तीन नंबरचा दरवाजा खुला झाला. त्यानंतर अकरा वाजता ६, ५, ४ व ७ क्रमांकाचे असे एकूण चार दरवाजे खुले झाले. धरणाची पाणीपातळी ३४६.७२ फूट असून ८२११.९७ द. ल. घ. फु. इतका पाणीसाठा आहे.

दरम्यान, धरणातून होत असलेल्या विसर्गामुळे भोगावती नदीचे पाणी पात्राबाहेर पडले आहे. धरणापासून दोन कि. मी. अंतरावर असणाऱ्या पडळी पुलावर पाणी आल्यामुळे राऊतवाडी धबधब्याकडे जाणारा मार्ग बंद झाला आहे.

## विवाहितेचा छळ; मुंबईतील पतीसह सहा जणांवर गुन्हा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह ६ जणांविरुद्ध लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती हैदरअल्ली अब्दुलगफार अन्सारी (वय ३२), सासरा अब्दुलगफार अन्सारी (६०), दीर अन्वर अब्दुल गफार अन्सारी (२९), नणंद सायराबानो मोईन मुस्ताक अन्सारी (३८), नणंदेचा पती मोईन मुस्ताक अन्सारी (४५, रा. गोवंडी, मुंबई) अशी त्यांची नावे आहेत.

दि.११ जून २०२२ ते २४ जुलै २०२४ या काळात हा प्रकार घडल्याचे ईशरत हैदरअल्ली अन्सारी (वय २८, रा. सोमवार पेठ, कोल्हापूर) यांनी फिर्यादीत म्हटले आहे. १० लाख रुपये हुंडा घेऊन ये, असा तगादा लावून शारीरिक, मानसिक त्रास दिल्याचे म्हटले आहे.


भारत सरकार
रेल्वे मंत्रालय
रेल्वे भरती विभाग, मध्य रेल्वे
सीपीएम कन्वर्जन्स ऑफिस बिल्डींग, पी.डी.मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई-४०० ०१०

**सांकेतिक अधिसूचना**

**रोजगार सूचना क्र. पीआरसी/सीआर/एस अँड जी/०२/२०२४**
**दिनांक : २७/०७/२०२४**

| | |
|---|---|
| स्लॉट खुले होण्याचा दिनांक आणि वेळ | २९/०७/२०२४ रोजी १०.०० वाजता |
| स्लॉट बंद होण्याचा दिनांक आणि वेळ | २८/०८/२०२४ रोजी १८.०० वाजता |

मध्य रेल्वे २०२४-२५ साठी स्काऊट्स आणि गाईड कोट्यातील खालील जागा भरण्यासाठी पात्र स्काऊट्स आणि गाईड कोटा उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागवत आहे.

| अनु. क्र. | स्तर/श्रेणी वेतन | (वेतन बँड) | कोटा | वितरण |
|---|---|---|---|---|
| १ | स्तर-२ (श्रेणी क) (१९००) | ५२००-२०,२०० | ०२ | मध्य रेल्वेत कुठेही |
| २ | स्तर-१ (श्रेणी ड) (१८००) | ५२००-२०,२०० | १० | बीबी, बीएसएल, एनजीपी, एसयुआर आणि पीए (*) विभागासाठी प्रत्येकी ०२ जागा |

**टीप : (*) बीबी-मुंबई, बीएसएल-भुसावळ, एनजीपी-नागपूर, एसयुआर-सोलापूर, पीए-पुणे**

- तपशीलवार अधिसूचनेसाठी कृपया आरआरसी/सीआरची वेबसाईट **www.rrccr.com** पहा, त्यावर २७/०७/२०२४ पासून उपलब्ध होईल.

**दिनांक : २७/०७/२०२४** **अध्यक्ष आरआरसी/सीआर**

तिकिटांसाठी युटीएस ॲप डाऊनलोड करा 285



Estd : 1962
“A++” Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**

**एम.बी.ए. (Distance) करिता प्रवेशाची सुवर्णसंधी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता एम.बी.ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत गुरूवार दि. १५ ऑगस्ट, २०२४ आहे.

**फेर प्रवेश परीक्षा रविवार, दि. १८ ऑगस्ट २०२४**

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन अथवा भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा ATMA तर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन (Management) विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या 'एम.बी.ए. (Distance)' अभ्यासक्रमाला थेट प्रवेश घेण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. अशा पात्र विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे वरीलप्रमाणे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू नसेल याची नोंद घ्यावी. तरी सदरच्या प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा.

तसेच याबाबतची सविस्तर माहिती व सूचना https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx या संकेतस्थळावर पहावी.

फेर प्रवेश परीक्षेस अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा.

ठिकाण : दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, कोल्हापूर
दिनांक : २६/०७/२०२४
जा.क्र. सीडीओई/१०३०

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
**कुलसचिव**



Pradhan Mantri Awaas Yojana-Gramin | स्वच्छ भारत - एक कदम स्वच्छता की ओर

**बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सांगली.**

**जाहीर संक्षिप्त ई-निविदा सूचना क्रमांक ०३ सन २०२४-२५ (NIT)**
**कार्यकारी अभियंता (इवद) जिल्हा परिषद सांगली**
**जाहीर ई-निविदा सूचना क्र. - ०३ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता (इवद) जिल्हा परिषद, सांगली या विभागाकडील विविध योजनांतर्गत एकूण १० कामांची ई- निविदा क्र.- ०३ सन २०२४-२०२५ ही सांगली जिल्हा परिषद सांगलीकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दोन लिफाफे पद्धतीने मागवीत आहे. ई-निविदा **https://www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर सर्व कामे दिनांक २४/०७/२०२४ रोजी दुपारी १७.०० वाजलेपासून दिनांक ०१/०८/२०२४ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत प्रसिद्ध करणेत येत आहे.

**सही/-**
कार्यकारी अभियंता (इवद)
जिल्हा परिषद, सांगली



**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर**

**ई-निविदा कार्यप्रणालीअंतर्गत निविदा सुचना क्र. २० सन २०२४-२५**

खालील कामाचे **“ब-१”** नमुन्यातील ऑनलाईन निविदा कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर ई-निविदा प्रणालीव्दारे पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागवित आहेत. निविदाधारकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिध्द केलेल्या व कॉन्ट्रॅक्ट डाटामधील अटी तांत्रिक स्पेसिफिकेशन व शेडयुलबी - मधील परिमाण हे बिड डाटा निविदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजित किंमत रु. लक्ष | इसारा रक्कम रुपये लक्ष | निविदा फी जीएसटी सह रु. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ठेकेदारांचा वर्ग (सा.बां. खातेकडील) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **खुली निविदा** | | | | | | |
| १ | कोल्हापूर जिल्हयातील करवीर तालुक्यातील परिते म्हाळुंगे चुये इजिमा ८५ मध्ये कि.मी. ०/०० ते ८/०० मध्ये सुधारणेसह रुंदीकरण करणे. | ब-१ | ५९५.८४ | २९८०००/- | ३५४०/- | १२ महिने | सा.बां. विभागाकडील नोंदणीची आवश्यकता नाही |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| निविदा डाऊनलोड करणेचा कालावधी | : | दि. २६/७/२०२४ (सकाळी १०.०० नंतर) ते २/८/२०२४ (१७.३० वाजेपर्यंत) |
| निविदा पूर्व चर्चा बैठक | : | दि. ३०/७/२०२४ दुपारी १२.०० वाजता मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, पुणे यांचे कार्यालयात |
| निविदा इसारा रक्कम, निविदा शुल्क व प्रतिज्ञापत्र इत्यादीचे मूळ दस्ताऐवज सादर करावयाचा दिनांक व वेळ | : | कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर<br>कार्यकारी अभियंता, सा.बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर<br>मा. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, कोल्हापूर<br>**वरील तिन्ही कार्यालयाचा पत्ता** - ताराबाई पार्क, मुख्य पोस्ट कार्यालय जवळ, रमणमळा, कोल्हापूर- ४१६००३ वरील कार्यालयात<br>दि. ५/८/२०२४ रोजी (११.०० पर्यंत) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | : | मा. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, कोल्हापूर येथे दि. ५/८/२०२४ रोजी (११.०१ वाजता) |

**टिप** - १. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या Main Portal - "https://mahatenders.gov.in" वर enrolled करणे आवश्यक आहे.
२. निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणेसंदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी ई-मेल **support-eproc@nic.in** व दूरध्वनी क्रमांक **0120-4200462, 0120-4001002** वर संपर्क साधावा.
३. निविदाकारांनी निविदासंदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कमेची ऑनलाईन पावती, ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड केलेली पावती, स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक वेळपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
४. निविदेचे वेळापत्रक, इतर अटी व शर्ती तसेच अनुषंगीक बदल ई-निविदा पोर्टलवर https://mahatenders.gov.in पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकारी सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
५. वरील कामांची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही/-**
**रोहित विश्वास तोंदले**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर**

डीजीआयपीआर/२०२४/२०२५/१२१३



**कोल्हापूर महानगरपालिका,**
**१५ वित्त आयोग**
**जाहीर नोटीस क्र. २१**

कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, १५ वा वित्त आयोग अंतर्गत प्रती आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता १ अटेंडंट व १ सफाई कामगार असे एकूण ५६ कर्मचारी यांची आऊट सोर्सिंग एजन्सीद्वारे पदे भरणेच्या अनुषंगाने दि. २६/७/२०२४ ते १६/८/२०२४ पर्यंत निविदा मागविणेत येत आहे. याबाबत एजन्सी नियुक्त करणेकामी फॉर्म, अटी व शर्तीसह कोल्हापूर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर (www.kolhapurcorporation.gov.in) प्रसिद्धी करणेत आलेली आहे.

तरी संबंधीत एजन्सींनी अटी/शर्तीची पूर्तता करत असलेची खात्री करून ऑनलाईन अर्ज भरणेत यावेत.

**आरोग्याधिकारी**
**कोल्हापूर महानगरपालिका**



**३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, सन २०२३-२०२४ (फक्त सभासदांकरिता)**

पाटबंधारे कर्मचाऱ्यांची सहकारी संस्था मर्यादित, विश्रामबाग, सांगली या संस्थेची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ११/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता पाटबंधारे भवन, विश्रामबाग, संस्थेचे प्रधान कार्यालय, सांगली येथे संस्थेचे चेअरमन मा. श्री. सुनिल शामराव चौगुले यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी खालील विषयावर चर्चा करणेसाठी व निर्णय घेणेसाठी सहभागी व्हावे ही विनंती.

*** सभेपुढील विषय ***

१) मंगळवार दि. ३०/०७/२०२३ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे. २) दि. १/४/२०२३ ते दि. ३१/३/२०२४ अखेरच्या ताळेबंद पत्रक, नफा तोटा पत्रक वाचून कायम करणे व निव्वळ नफ्याच्या विभागणीस मंजुरी देणे. ३) सन २०२३-२०२४ सालाचे अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे. ४) सन २०२४-२०२५ सालाचे अंदाजपत्रक मंजूर करणे. ५) पोटनियम क्र. फ - १ - ९ - इ प्रमाणे सन २३/२४ मध्ये सभासद कल्याण निधीमधून अदा केलेल्या रक्कमेस मंजुरी देणे. ६) संचालक मंडळाने सुचविलेल्या प्रस्तावित पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे.७) सन २०२२-२०२३ लेखापरिक्षण दोषदुरुस्ती अहवालाचे वाचन करणे. ८) सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या अहवालाचे वाचन करणे. ९) सन २०२४-२०२५ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे. १०) सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांना क्षमापित करणे. ११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी होणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**ठिकाण : विश्रामबाग, सांगली.**
**दिनांक : २६/०७/२०२४**

**श्री. एस. के. होरे** — **सचिव** (अतिरिक्त कार्यभार)
**श्री. सुनिल शामराव चौगुले** — चेअरमन

**टीप :**
१) सभासदांना कामकाजाबद्दल माहिती घेणेची असल्यास ती संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल व ज्यांना वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके याबाबत प्रश्न विचारावयाचे असतील किंवा मार्गदर्शक सूचना करावयाच्या असतील, त्यांनी दि. २/०८/२०२४ पर्यंत सांगली मुख्यालयात दुपारी ३.०० वाजेपर्यंत अगर तत्पुर्वी पोस्टाने देणेचे आहेत. २) कोरमअभावी सभा तहकुब झालेस त्याच दिवशी १ तासानंतर त्याच ठिकाणी घेण्यात येईल. त्यासाठी कोरमची आवश्यकता भासणार नाही. ३) दि. ३१/३/२०२४ अखेरची शेअर सर्टिफिकेट तयार आहेत ती घेवून जावीत व दोन फोटो देवून सभासदांनी पासबुक घेऊन जावे. तसेच स्वत:चा मोबाईल नंबर देणेत यावा. ४) सर्व सभासदांचा सन २०२३-२४ चा लाभांश सभासदांच्या बँक खात्यावर जमा करणेत येणार असून आपल्या बँकेची माहिती, खाते क्रमांक, IFSC Code इ. तपशील संस्थेमध्ये देणेत यावा.५) ज्या सभासदांनी मागील ३ वर्षाचा लाभांश नेलेला नाही त्यांनी तो दिनांक ३१ / १२ / २०२४ पर्यंत घ्यावा. त्यानंतर सदरचा लाभांश नियमाप्रमाणे राखीव निधीत जमा करणेत येईल. ६) वार्षिक सभेच्या अगोदर रोखपाल मानधन धनादेश वितरीत करणेत येणार आहेत. तरी सर्व कार्यालयीन रोखापालांनी हजर रहावे.

कृपया सभा चालू असताना अहवालाची प्रत समोर घ्यावी ही विनंती.



**मार्गो फायनान्स लिमिटेड**
सीआयएन : L65910MH1991PLC080534
नोंदणीकृत कार्यालय : ऑफीस क्र.३, प्लॉट क्र.२०६, गाव आळते, कुंभोज रोड, तालुका हातकणंगले, जि. कोल्हापूर -४१६ १०९, महाराष्ट्र

**३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

सूचना देण्यात येते की मार्गो फायनान्स लिमिटेड (कंपनी)च्या सदस्यांची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम)कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या सर्क्युलर क्र. ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ ला अनुसरून **बुधवार, २१ ऑगस्ट, २०२४रोजी दुपारी १२.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ)** समान ठिकाणी सदस्यांनी प्रत्यक्ष उपस्थित न राहता **व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) द्वारे** होणार असून त्यात एजीएमच्या सूचनेत नमूद केलेला व्यवहार होणार असून ती कंपनीच्या सदस्यांना ईमेल करण्यात येईल.

कंपनी/डिपॉझिटरी पाटीसिपन्ट्स यांच्याकडे ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत आहेत, त्यांना ३३वी एजीएमच्या आयोजनाची सूचना, ई-मतदानासाठीची प्रक्रिया आणि सूचना आणि आर्थिक वर्ष २०२३-२४चा वार्षिक अहवाल यांची इलेक्ट्रॉनिक प्रत पाठवण्यात येईल. सदस्यांनी नोंद घ्यावी की, सूचना आणि वार्षिक अहवाल हे कंपनीची वेबसाईट www.margofinance.com आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com आणि एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वरसुद्धा उपलब्ध आहेत.

**सदस्यांनी त्यांचे ई-मेल आयडी आणि केवायसी तपशीलांची नोंद करण्याचे आवाहन**

**ज्या भागधारकांनी अद्याप त्यांची ई-मेल आयडी नोंदीकृत केलेले नाही त्यांनी त्यांचे ई-मेल आयडी खालीलप्रमाणे नोंदीकृत करावेत.**

१. **प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स असलेले भागधारक :** अशा भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांचे ई-मेल आयडी कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) म्हणजे लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे कंपनीचे आरटीए यांना delhi@linkintime.co.in वर किंवा कंपनीकडे info@margofinance.com वर विनंती पाठवून नोंदीकृत करावेत. सदर विनंतीबरोबर अर्ज आयएसआर-१ केवायसी अद्ययावतीकरणासाठी जोडण्यात यावा.
२. **डिमटेरियलाईज्ड स्वरूपात शेअर्स असलेले भागधारक :** अशा भागधारकांनी त्यांचे ई-मेल आयडी संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट्सकडे नोंदीकृत करावेत.

ई-मेल ॲड्रेसेस नोंदीकृत करण्यासंदर्भात कोणतीही चौकशी/शंका विचारायची असल्यास, भागधारकांनी आरटीए यांना delhi@linkintime.co.in वर किंवा कंपनीकडे info@margofinance.com वर लिहावे.

**दूरस्थ ई-मतदान, एजीएमच्या ठिकाणी ई-मतदान आणि लॉगइन आयडी आणि पासवर्ड मिळवण्याची पद्धती**

एजीएमच्या सूचनेत नमूद केल्यानुसार व्यवहारावर सदस्य त्यांचे मत(मते) दूरस्थ ई-मतदान सुविधेमार्फत देऊ शकतात. ज्या भागधारकांचे ईमेल आयडी आधीच कंपनी/डिपॉझिटरीकडे नोंदवण्यात आले आहेत, त्यांनी एजीएमच्या सूचनेत ई-मतदानाविषयी देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे, अशी विनंती करण्यात येत आहे. ज्या भागधारकांचे ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी पार्टीसिपन्ट्स यांच्याकडे नोंदवण्यात आलेले नाहीत त्यांनी ई-मतदानासाठी युजर आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी खालील प्रक्रियेचे पालन करावे-

अ) शेअर्स प्रत्यक्ष स्वरूपात असतील, त्यांनी कृपया फोलिओ क्र., भागधारकाचे नाव, पॅनकार्ड, आधार कार्ड/इतर कोणताही पत्त्याचा पुरावा असलेल्या कागदपत्राची स्वप्रमाणित स्कॅन प्रतीसह लिंक इनटाईम यांना delhi@linkintime.co.in वर स्वाक्षरीसह विनंतीपत्राची स्कॅन प्रत पाठवावी.
ब) डिमॅट स्वरूपात शेअर्स असतील त्यांनी डीपीआयडी-सीएलआयडी, नाव, पॅनकार्ड, आधार कार्ड/इतर कोणताही पत्त्याचा पुरावा असलेल्या कागदपत्राची स्वप्रमाणित स्कॅन प्रतीसह लिंक इनटाईम यांना delhi@linkintime.co.in वर स्वाक्षरीसहीत विनंतीपत्राची स्कॅन प्रत पाठवावी.
क) अन्य सदस्यांनी युजर आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी जे लागू असेल त्याप्रमाणे मुद्दा (अ)किंवा (ब)मध्ये नमूद केलेले तपशील पाठवून evoting@nsdl.co.in वर ई-मेल विनंती करावी.

**बुक क्लोजर**

कंपनीचे रजिस्टर ऑफ मेंबर्स आणि शेअर ट्रान्सफर बुक्स हे बुधवार १४ ऑगस्ट, २०२४ ते बुधवार २१ ऑगस्ट,२०२४ (दोन्ही दिवसांसहीत) ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी बंद राहतील.

संचालक मंडळाच्या आदेशाने
**मार्गो फायनान्स लिमिटेडसाठी**

**दिनांक :२६ जुलै,२०२४**
**ठिकाण : मुंबई**

**स्वाक्षरी/-**
**कृष्णा मकवाना**
**कंपनी सेक्रेटरी**